गोदातीर दि. 6.9.25

# जबरी चोरी करणाऱ्या तीन चोरट्यांना मुदखेड पोलिसांनी केली अटक

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुदखेड पोलिसांच्या कारवाईमध्ये तीन जबरी चोरी करणारे चोरटे अटक करण्यात आले. त्यांच्याकडून जवळपास दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



दि. २७ ऑगस्ट रोजी यातील फिर्यादी हे भारत फायनान्स कंपनीचे कामानिमित्त बचत गटाची वसुलीकरिता कामळज येथे जाऊन वसुली केली. त्यानंतर दुपारी १२.३० वाजेच्यादरम्यान देवापुरकडे जात असताना यातील आरोपींनी फिर्यादीला बजाज कंपनीच्या पल्सर मोटारसायकलवर येऊन रोडवर अडविले. यावेळी चाकुचा धाक दाखवून फिर्यादीजवळील नगदी रुपये ५८ हजार ५२५ रुपये, एक सॅमसंग कंपनीचा टॅब व बायोमॅट्रीक डिवाईस जबरीने चोरी करून पसार झाले. याप्रकरणी गुन्हहा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा उघडकीस आणण्याबाबत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांना आदेशीत केले होते. त्यावरुन पोलीस स्टेशन मुदखेड येथे वेगवेगळे पथक तयार करुन पोलीस स्टेशनला दाखल असलेले चोरी व जबरी चोरीचे गुन्हे उघड करण्याबाबत पथकांना आदेशीत केले होते. पोउपनि आकाश सरोदे यांनी व त्यांचे पथकांनी गुप्त माहिती घेऊन गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करुन आरोपींचा शोध घेऊन गुन्ह्यात अटक केली आहे. आरोपींना गुन्ह्यासंबंधाने विचारपुस केली असता सदरचा गुन्हा हा चौघांनी मिळून केल्याबाबत सांगत असल्याने ताब्यातील आरोपींना गुन्ह्यात अटक करुन न्यायालयात हजर करुन त्यांच्याकडे तपास केला असता आरोपींनी गुन्ह्यातील जबरी चोरी केलेला नमुद मुद्देमाल काढून दिल्याने तो गुन्ह्यात जप्त करण्यात आला आहे.

गुन्ह्यातील एक आरोपी फरार असून अटक आरोपी एमसीआरमध्ये असून सदर गुन्हयाचा तपास पोउपनि आकाश सरोदे हे करत आहेत. सदर आरोपीकडून इतर चोरीचे गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.